admn 18-19

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.

अतितात्काळ

जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र-१४१८/ 1257

दिनांक: ५ जून,२०१८

## परिपत्रक

**विषय :- पदवी प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ करिता पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी संकेतस्थळावर नोंदणी करणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत (१) बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), (२) बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), (३) बी.एफ्.एस्सी., (४) बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), (५) बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन), (६) बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), (७) बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), (८) बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि (९) बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) हया अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे राबविण्यात येणार असल्याचे आपणास विदितच आहे. सदरची प्रवेश प्रक्रिया दि. ११ जून,२०१८ पासून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

यासंदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयाकडून प्राप्त सूचनानुसार उक्त अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, **त्यांनी www.maha-agriadmission.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे.** यासाठी लॉगइनद्वारे महाविद्यालयांची मान्यताविषयक माहिती जसे, कृषी परिषदेकडील मान्यताविषयक पत्र / आदेश, कृषी विद्यापीठांकडील मान्यताविषयक किंवा संलग्नीकरणविषयक पत्र / आदेश, शासकीय / अनुदानित महाविद्यालयांच्याबाबतीत मान्यतेविषयक शासन निर्णय स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत. तसेच प्रवेश क्षमता, संपर्क अधिकाऱ्याचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ता, वसतीगृह क्षमता इत्यादी माहिती देण्यात यावी.

याचबरोबर वरील सर्व विद्याशाखांच्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांना असे सूचित करण्यात येते की, **राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयाने नोंदणी शुल्क म्हणून रू.१५००/- प्रती तुकडी अशी रक्कम निश्चित केलेली आहे.** यामुळे विना अनुदानित

admn 18-19

महाविद्यालयांनी त्यांच्या एकूण तुकडया विचारात घेऊन त्याप्रमाणे होणारे शुल्क लॉगइनद्वारे राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावे.

**सर्व महाविद्यालयांनी, वरीलप्रमाणे नोंदणीविषयक कार्यवाही न केल्यास, उमेदवारांनी प्रवेशाकरिता दाखल केलेल्या विकल्पामधून अशा महाविद्यालयांचे विकल्प वगळण्यात येतील. परिणामी या महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविता येणार नाही व त्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित महाविद्यालयाची असेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**मा. महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

संचालक (शिक्षण)

प्रति,

(१) प्राचार्य, चारही कृषी विद्यापीठातील (१) बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), (२) बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), (३) बी.एफ्.एस्सी., (४) बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), (५) बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन), (६) बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), (७) बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), (८) बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि (९) बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) हे अभ्यासक्रम राबविणारी सर्व महाविद्यालये.

प्रत कार्यवाहीसाठीः-

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांनी कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक प्रवेश प्रक्रियाविषयक संकेतस्थळावर उपलब्ध करावे. तसेच सर्व महाविद्यालयांच्या लॉगइनमध्ये आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून द्यावी.

प्रत माहितीसाठीः-

मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना माहितीसाठी सविनय सादर...